# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.10.2024** **वारःशुक्रवार**

1. ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांना भावपूर्ण वातावरणात अखेरचा निरोप, मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार
2. नॉन क्रिमिलेयर मर्यादा 8 लाखांवरुन 15 लाख करण्याची शिफारस केंद्र सरकारला करायचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
3. शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी, लोहार, नाथपंथीय समाजाबरोबरच पत्रकार आणि महामंडळं स्थापन करणार वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी महामंडळं स्थापन करण्याचाही निर्णय आणि
4. राज्याच्या बहुतांश भागात आज पावसाचा अंदाज; तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**रतन टाटा-अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ उद्योगपती, टाटा सन्सचे मानद अध्यक्ष आणि टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा यांना काल भावपूर्ण वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. मुंबईत वरळी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते.

तत्पूर्वी काल सकाळी टाटा यांचं पार्थिव शरीर एन सी पी ए इथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार, सुप्रिया सुळे, प्रफुल्ल पटेल, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास; अनेक उद्योगपती, टाटा समूहाच्या विविध कंपन्यांचे अधिकारी आणि कर्मचारी, तसंच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक व्यक्तींनी टाटा यांचं अन्त्यदर्शन घेऊन त्यांना आदरांजली वाहिली.

काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतही रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रतन टाटा यांचं कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही या बैठकीत संमत करण्यात आला. राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या उद्योगरत्न पुरस्काराचं 'रतन टाटा उद्योगरत्न पुरस्कार' आणि उद्योग भवनाचं 'रतन टाटा उद्योगभवन' असं नामकरण करण्यात येईल अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काल केली.

उद्योग विश्वात आपलं वेगळं स्थान निर्माण करतानाच समाजासाठी प्रेरणादायी काम उभं करणाऱ्या रतन टाटा यांच्या निधनाबद्दल काल संपूर्ण देशभरातून शोक भावना व्यक्त करण्यात आली. देश-परदेशातल्या अनेक मान्यवरांनीही टाटा यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली.पिंपरी चिंचवड शहराला उद्योग नगरी अशी ओळख देणारे रतन टाटा यांना काल  पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

**मंत्रीमंडळ**

नॉन क्रिमिलेयरची मर्यादा 8 लाखांवरुन 15 लाख करण्याची शिफारस केंद्र सरकारला करायचा निर्णय काल राज्य मंत्री मंडळानं घेतला. तसंच शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी, लोहार, नाथपंथीय समाज, आणि पत्रकार तसंच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी महामंडळं स्थापन करण्याचा निर्णयही राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत काल घेण्यात आला. या बैठकीतील अन्य महत्त्वाच्या निर्णयांबाबत हा वृत्तांत...

**मौलाना आझाद महामंडळाच्या भागभांडवलात, तसंच मदरश्यांमधल्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करायला राज्य मंत्रीमंडळानं काल मंजुरी दिली. राज्यात आंतरराष्ट्रीय रोजगार आणि कौशल्य विकास कंपनी स्थापन करणं, तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता, कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापन करायलाही मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली. शाळांना 20 टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा, राज्यातील अंगणवाड्यांमध्ये 345 पाळणाघरं सुरु करणं, केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन योजना राज्यात राबवणे, 'आपले सरकार सेवा केंद्र' केंद्र चालकांना दरमहा दहा हजार रुपये मानधन, 57 सार्वजनिक रुग्णालयांमधे सुलभ शौचलयांची सुविधा उपलब्ध देणं यासारखे निर्णय कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास विभागाची पुनर्रचना, तुळजापूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील वणी इथं दिवाणी न्यायालय स्थापन करून त्यासाठी पदे मंजूर करणं, त्याचबरोबर वांद्रे शासकीय वसाहतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. पुण्यातील कात्रज-कोंढवा राष्ट्रीय महामार्गावरील भुयारी मार्ग आणि उड्डाणपूलाला सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचे नाव देण्यास मंत्रिमंडळाने या बैठकीत मंजूरी दिली. राज्यात वाचन संस्कृती आणि ग्रंथ चळवळ वाढीला लावण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमात सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला राज्य सरकारनं वैधानिक दर्जा दिला. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून राजेंद्र लेले.**

**शेखावत-नवी मुंबई**

आपल्या देशाची सांस्कृतिक मूल्य जपायची असतील तर, देशाचे सांस्कृतिक दूत बना असं आवाहन केंदीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी काल तरुणांना केलं. नवी मुंबईतील डी. वाय. पाटील विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या 'विकसित भारतासाठी युवा शक्ती' या कार्यक्रमात ते बोलत होते. आज जग भारताकडे आदराने आणि अपेक्षेने बघत आहे. या काळात बदलाचे साक्षीदार नव्हे तर बदल घडवण्यात भूमिका बजावा असं शेखावत म्हणाले. या कार्यक्रमाला डी. वाय पाटील विद्यापीठाचे डॉक्टर विजय पाटील, विद्यापीठातील वरिष्ठ प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**धम्मचक्र प्रवर्तन दिन**

68व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरातील दीक्षाभूमीवर कालपासून धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ झाला. हा सोहळा तीन दिवस चालणार आहे. दीक्षा घेण्यासाठी देशभरातून अनेक अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत.

**उड्डाण-नवी मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर आज हवाई दलाचं सुखोई 30 विमान उड्डाण करणार आहे. लष्कराचं विमानही प्रत्यक्ष धावपट्टीवर उतरवण्यात येणार आहे. केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल आदि मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**ज्ञानराधा**

सक्तवसुली संचालनालयानं ज्ञानराधा बहुराज्यीय सहकारी पत संस्था लिमिटेड आणि इतरांच्या सुमारे 1 हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या स्थावर मालमत्तेवर टाच आणली आहे. जप्त केलेल्या मालमत्तेत मुंबई, छत्रपती संभाजी नगर, बीड आणि जालना जिल्ह्यातल्या इमारती आणि जमिनींचा समावेश आहे. या कंपनीविरोधात राज्यातल्या अनेक पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारींच्या आधारे ईडीनं हा तपास सुरु केला होता. या कंपनीनं जास्त परतावा देण्याचं अमिश दाखवून 4 लाखांहून अधिक गुंतवणूकदारांना गंडा घातल्याचं या तपासात निष्पन्न झालं आहे.

**रत्नागिरी-क्षयरोग**

रत्नागिरी जिल्ह्यातली 42 गावं क्षयरोगमुक्त झाली आहेत. त्याबद्दल संबंधित ग्रामपंचायतींचा नुकताच सन्मान करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तिकिरण पुजार यांच्या हस्ते या ग्रामपंचायतींना गौरवण्यात आलं. केंद्र सरकारने 2025 पर्यंत देश क्षयरोगमुक्त करण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. त्याअंतर्गत क्षयरोगमुक्त पंचायत हा उपक्रम राबवला जात आहे.

**पाऊस-सातारा, पालघर, कोल्हापूर**

राज्यात काल अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. सातारा शहर आणि परिसरात काल दुपारी मुसळधार पाऊस झाला. या पावसाने जनजीवन विस्कळीत झालं होतं. पालघर जिल्हयात काल वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. कोल्हापुरातही काल दुपारी वीजांसह जोरदार पाऊस झाला.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण मध्य महाराष्ट्र विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी वीजांसह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागान दिला आहे. किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची ही शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.